ePaper

**कोलंबियात लँडिंगच्या आधी विमान क्रॅश; घटना कॅमेरात कैद**



वर्ष - 9 I अंक - 155 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™


पान 2 वरुन...

अजितदादा पवार अनंतात विलीन..!

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 30 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मतदान-मतमोजणी कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष

# अजितदादांच्या निधनानंतर ZP-पंचायत समिती निवडणुका पुढे ढकलल्या...

**महाईन्यूज**

**मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे 12 जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून 5 फेब्रुवारी 2026 ऐवजी आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदान; तर 7 फेब्रुवारी 2026 ऐवजी 9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होईल.**




राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी 13 जानेवारी 2026 रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांच्यी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी 31 जानेवारी 2026 च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे 28 जानेवारी 2026 रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात 28 जानेवारी 2026 ते 30 जानेवारी 2026 पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे.



या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना 31 जानेवारी 2026 रोजी प्रसिद्ध करतील.

आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती 5 फेब्रुवारी 2026 रोजी रात्री 10 वाजता होईल. संबंधित ठिकाणी 9 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात 11 फेब्रुवारी 2026 पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

## निवडणूक कार्यक्रमात बदल

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. पूर्वी ५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणारे मतदान आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार असून, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणारी मतमोजणी आता ९ फेब्रुवारी २०२६ रोजी घेतली जाणार आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता होणार आहे. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

# अजितदादा पवार अनंतात विलीन..!

## लाडक्या नेत्याला निरोप देताना बारामतीकरांना फुटला अश्रूंचा बांध

**महाईन्यूज**

**पुणे :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी (दि. २८) सकाळी पावणेनऊच्या सुमारास अपघाती निधन झाले. गुरूवारी दुपारी १२ वाजून ८ मिनिटांनी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पार्थ आणि जय पवार यांनी अजित पवारांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. यावेळी जमलेल्या लाखो कार्यकर्ते आणि बारामतीकरांनी अश्रू ढाळत लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.



मुंबईहून बारामतीकडे जिल्हा परिषदेच्या प्रचारासाठी येत असताना बुधवारी विमान अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचे निधन झाले. यानंतर संपूर्ण राज्यभर शोकाकुल वातावरण पसरले. अजित पवारांचा मृतदेह बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वैद्यकीय महाविद्यालयात आणण्यात आला. तेथे त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर बुधवारी संध्याकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी अजित पवारांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते.

गुरुवारी सकाळी अजित पवार यांचे पार्थिव सकाळी आठच्या सुमारास काटेवाडी येथील त्यांच्या मूळ निवासस्थानी ठेवण्यात आले. त्यानंतर त्यांच्या घरातून अंत्ययात्रेला सुरुवात करण्यात आली. बारामती येथील पेन्सिल चौकातून विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात त्यांना आणण्यात आले. त्यावेळी जमलेल्या लाखोंच्या जनसमुदायांच्या मुखातून, 'अजित दादा अमर रहे'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी उपस्थित अनेकांना त्यांचे अश्रू अनावर झाले होते. 'दादा परत या... परत या...' अशा घोषणादेखील उपस्थित जनसमुदायांकडून वारंवार देण्यात येत होत्या. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंबीय उपस्थित होते. अजित पवारांचे पार्थिव मैदानात उभारण्यात आलेल्या चौथऱ्यावर ठेवण्यात आले. त्यानंतर वैदिक पद्धतीने मंत्रोच्चार करण्यात आले. त्यानंतर आलेल्या मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण केले. यावेळी शासकीय इतमामात बंदुकीच्या फैरी झाडत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### या मान्यवरांनी वाहिली श्रद्धांजली...

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, शंभुराज देसाई, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मेघना बोर्डीकर यांच्यासह खासदार प्रफुल्ल पटेल, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, चंद्रकांत पाटील, मुरलीधर मोहोळ, खासदार छत्रपती शाहू महाराज, आंध्र प्रदेशचे शिक्षणमंत्री नारा लोकेश, सी. एम. रमेश, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आदिती तटकरे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, गणेश नाईक, सुशीलकुमार शिंदे, जयंत पाटील, रवींद्र चव्हाण, अशोक चव्हाण, पंकजा मुंडे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शशिकांत शिंदे, गिरीश महाजन, नीरज चंद्रशेखर, महादेव जानकर, जयकुमार गोरे, डॉ. अमोल कोल्हे, राधाकृष्ण विखे-पाटील, रितेश देशमुख, नरहरी झिरवळ, राहुल कुल, दत्तात्रय भरणे, राजेश टोपे, धैर्यशील मोहिते-पाटील, मकरंद पाटील, विजय शिवतारे, मंगलप्रभात लोढा, संजय राठोड, राजेंद्र गवई, श्रीकांत शिंदे, डॉ. प्रीतम मुंडे, आकाश फुंडकर, निवेदिता माने, रुपाली चाकणकर, सचिन आहेर, सतीश चव्हाण, पोलिस महासंचालक सदानंद दाते, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह राज्यभरातील खासदार, आमदार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. एम.एस धोनी, कपिल देव.

### बारामतीकरांनी पाळली शिस्त...

अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारावेळी लाखोंचा जनसमुदाय विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात जमला होता. यावेळी कोणतीही गडबड, गोंधळ न करता शिस्त पाळून त्यांच्या लाडक्या दादांना त्यांनी श्रद्धांजली वाहिली. पहाटे पाच वाजल्यापासून चाहत्यांनी मैदानावर गर्दी केली होती. जसजशी अंत्यसंस्काराची वेळ जवळ येत होती, तसतसा लाखोंच्या संख्येने जनसमुदाय विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात जमा होत होता. प्रत्येकाला अजित पवारांना बघण्याची शेवटची इच्छा होती. मैदान परिसरात व बाहेरच्या बाजूला अजित पवारांचे अंतिम दर्शन सगळ्यांना व्हावे, यासाठी डिजिटल स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी महिलांची उपस्थितीदेखील मोठ्या संख्येने होती.

### ११ हजार पोलिसांचा बंदोबस्त

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर संपूर्ण राज्यभरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजताच सबंध राज्यभरातून मिळेल त्या वाहनाने लोकांनी बारामतीकडे धाव घेतली. या पार्श्वभूमीवर बारामती शहर व परिसरात अभूतपूर्व पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पुणे ग्रामीण पोलिसांसह पुणे पिंपरी-चिंचवड, ठाणे, कोल्हापूर, सातारा येथील पोलिसांसह राज्य राखीव पोलीस (एसआरपी) असा ११ हजारांचा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी स्वतंत्र वाहतुकीचेदेखील नियोजन करण्यात आले होते.



# चिंचवडमध्ये १५ लाखांचे मेफेड्रोन जप्त

## अमली पदार्थ विरोधी पथकाची मोठी कारवाई; तिघांना अटक





**महाईन्यूज**

**पिंपरी : अमली पदार्थ विरोधी पथकाने चिंचवड परिसरात मोठी कारवाई करत १५ लाख १२ हजार रुपये किमतीचे मेफेड्रोन (एमडी) जप्त केले आहे. ही कारवाई मंगळवारी (२७ जानेवारी) रात्री बिजलीनगर चौक परिसरात करण्यात आली.**

या प्रकरणी पोलीस शिपाई गोविंद डोके यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी किशना सैतानराम देवासी (२५, बिजलीनगर), मेकाराम ऊर्फ शाम नारायणराम देवासी (२६, बिजलीनगर) आणि पुरण चौथाराम देवासी (२४, कात्रज, पुणे) यांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिजलीनगर परिसरात मेफेड्रोन विक्रीसाठी काही जण येणार असल्याची माहिती मिळाली होती. पोलिसांनी सापळा लावून दोघांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडे १४२ ग्रॅम २३० मिली ग्रॅम वजनाचे अमली पदार्थ सापडले. अधिक चौकशीत हा माल त्यांनी कात्रज येथील पुरण देवासी याच्याकडून विक्रीसाठी आणल्याचे समोर आले. पोलिसांनी अंमली पदार्थासह एक दुचाकी आणि दोन मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे. चिंचवड पोलीस तपास करत आहेत.

### पिस्तुल आणि काडतुसासह दोघांना अटक

विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तुल आणि जिवंत काडतूस बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. ही कारवाई मंगळवारी (२७ जानेवारी) रात्री इंदोरी बायपास येथे करण्यात आली. सनी सुरेश शिंदे (३३, कान्हेवाडी, खेड) आणि अभिषेक अशोक येवले (कान्हेवाडी, खेड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस शिपाई वसीम शेख यांनी या प्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींकडे पिस्तुल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सापळा लावून त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून ३० हजार रुपये किमतीचे पिस्तुल, १ हजार रुपयांचे जिवंत काडतूस आणि साडेसहा लाख रुपये किमतीची मोटार असा एकूण ६ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तळेगाव एमआयडीसी पोलीस तपास करत आहेत.



# महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसला महापौरपद देणे हीच अजितदादांना खरी श्रद्धांजली ठरेल





**महाईन्यूज**

**पिंपरी : उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांचे पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत व विकासात मोलाचे योगदान आहे. त्यांच्या या योगदानाचा सन्मान राखत, तसेच त्यांना श्रद्धांजली म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौरपद देऊन मोठेपण दाखवावे, अशी अपेक्षा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री वृक्षमित्र (महाराष्ट्र शासन) तथा मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार यांनी व्यक्त केली आहे.**

अरुण पवार म्हणाले, की सध्या राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत असून, स्व. अजित पवार हे महायुतीतील अत्यंत महत्त्वाचे व प्रभावी नेते होते. राज्याच्या राजकारणासोबतच विकास प्रक्रियेत त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे. विशेषतः पिंपरी-चिंचवड शहराच्या औद्योगिक, पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या विकासकामांमध्ये अजित पवार यांची दूरदृष्टी स्पष्टपणे दिसून येते.

अरुण पवार पुढे म्हणाले की, राजकारणात मतभेद असू शकतात; मात्र विकासासाठी काम करणाऱ्या नेत्याचा सन्मान हा सर्वपक्षीय असायला हवा. स्व. अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरासाठी दिलेले योगदान लक्षात घेता, त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रवादी काँग्रेसला महापौरपद देणे हा एक सकारात्मक आणि समन्वयाचा संदेश देणारा निर्णय ठरेल.

असा निर्णय घेतल्यास महायुती सरकारकडून राजकीय परिपक्वता, सलोखा आणि विकासाला प्राधान्य देण्याची भूमिका अधोरेखित होईल, तसेच राज्यातील नागरिकांमध्येही सकारात्मक संदेश जाईल, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

# सच्चा मित्र आणि सहकारी



## भूमिका

**अजितदादा पवार यांचे असे विमान अपघातात जाणे केवळ आम्हालाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राला आणि देशाला धक्का आहे. अजितदादा आणि माझा तीसहून अधिक वर्षांचा स्नेह. मी, दिलीपराव वळसे-पाटील, आर. आर. आबा, अजितदादा असे आम्ही सर्व एकाच वेळी विधानसभेत आमदार म्हणून आलो आणि त्यामुळेच प्रदीर्घ काळ सोबत काम करता आले.**

अजितदादांची काम करण्याची पद्धत मी फार जवळून अनुभवली. ते खर्‍या अर्थाने तळागळातून आलेले नेते यासाठी होते की, त्यांनी शेतीतील भाजीपाला विकणे इथपासून ते संस्था सांभाळणे, आमदार, मंत्री, उपमुख्यमंत्री अशा सार्‍या जबाबदार्‍या यशस्वीपणे पार पाडल्या. ते पवारसाहेबांचे पुतणे असले, तरी कार्यकर्ता ते राज्याचा उपमुख्यमंत्री असा त्यांचा प्रवास होता. अजितदादा 16 वर्षे पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष होते. त्या काळात पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या ठेवी 300 कोटींहून 1 लाख 60 हजार कोटींपर्यंत पोहोचल्या. अत्यंत सक्षमपणे त्यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक सांभाळल्याने त्यांना आदरणीय साहेबांनी लोकसभेवर जाण्याची संधी दिली आणि ते प्रचंड मताधिक्याने लोकसभेवर निवडून गेले.




बहुधा अजितदादांच्या खमक्या स्वभावाला लोकसभा रुचली नसावी की काय, ते लगेच महाराष्ट्राच्या विधिमंडळात परतले. सुधाकरराव नाईक यांनी अजितदादांच्या कामांचा झपाटा बघून त्यांची कृषी आणि ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री म्हणून निवड केली. त्यानंतर पवार साहेबांच्या मंत्रिमंडळातही अजितदादांनी उत्तम कामगिरी बजावली. 1995 ते 1999 या काळात आम्ही सर्वजण विरोधी पक्षात होतो. त्यावेळी मी, दादा, आबा, दिलीपराव असे एकत्र विधानसभेत बसायचो. पत्रकारांनी त्यावेळी आम्ही सभागृहात बसायचो त्या जागेला ‘अशांत टापू’ असे नाव दिले होते.

आम्ही विरोधी पक्षात असताना सरकारच्या चुकीच्या धोरणांवर अक्षरशः तुटून पडत असू. 1999 मध्ये आम्ही एकाच वेळी कॅबिनेट मंत्री झालो. माझ्याकडे अर्थ खाते होते. अजितदादांकडे जलसंपदा खात्याची जबाबदारी होती. पुढे 15 वर्षे सत्तेत असताना आणि नंतरही महाविकास आघाडीच्या काळात आणि आता पुन्हा उपमुख्यमंत्री म्हणून जी-जी खाती अजितदादांना मिळाली त्यात त्यांनी अत्यंत समरस होऊन काम केले. मंत्रिमंडळ बैठकीत दादा जनतेच्या भूमिका अत्यंत ताकदीने मांडत.

प्रशासनावरील पकड पुणे, पिंपरी-चिंचवड शहर व बारामती तालुक्याच्या विकासात त्यांचे असलेले योगदान हे अत्यंत वाखाणण्याजोगे आहे. सार्वजनिक जीवनात इतकी वर्षे वावरल्यानंतरही अजितदादा व्यसनांपासून लांब होते. पक्षाच्या कार्यकर्त्यांनाही ते व्यसनांपासून दूर राहण्याची सक्त ताकीद देत असत. सकाळी सात वाजल्यापासून कामाला लागणे, कामात शिस्त बाळगणे व दिलेला शब्द पाळणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. अनेकदा वरवर जरी ते कडक स्वभावाचे वाटत असले, तरी आतून ते मृदू आणि हळव्या स्वभावाचे होते. अजितदादांनी साठी पार केली यावर विश्वासच बसत नाही, इतके ते तरुण आणि उत्साही होते.

जीवनातील सर्व आव्हानांना तोंड देण्याची अजितदादांमध्ये क्षमता होती.

राज्याच्या राजकारणात अजून मोठी भूमिका ते पार पाडतील, असा आम्हाला विश्वास असताना नियतीने त्यांना अशाप्रकारे हिरावून नेले आहे. दादांच्या जाण्याने मी एक सच्चा मित्र आणि सहकारी गमावला. माझ्या जीवनात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

**- जयंत पाटील, आमदार**

## प्रासंगिक »

### प्रसंगाचे भान ठेवावे

***एका सरोवरात कुबु ग्रीव् नावाचे कासव राहत होते. दोन हंस तिथे जलविहारासाठी येत. कासवाशी त्यांची मैत्री झाली. कासवाला ते चांगल्या चांगल्या कथा सांगत.***

एक वर्षी अवर्षणामुळे सरोवर आटले. हंस कासवाला म्हणाले, लवकरच राहिलेला चिखल सुद्धा आटेल. मग तुझं कसं होईल? सह विचारातून एक युक्ती सुचली. एक लांब काठी दोन बाजूंनी हंसाने तोंडात धरावी व मध्यभागी कासवाने पकडावे. हंसाने उडत उडत दुसऱ्या तलावात जावे. त्यांनी कासवाला उडत उडत दुसऱ्या तलावात घेऊन जावे. त्यांनी कासवाला बजावले, मधे कोणत्याही कारणासाठी तोंड उघडू नको. नाहीतर उंचावरून पडून प्राण गमावशील. उड्डाण सुरू झाले मधेच एका गावातील लोक आश्चर्याने पाहत म्हणाले, “हे हंस गोल गोल काय नेत आहेत?” कासव रागावले ते हंसाला म्हणणार होते. “या मूर्खांना एवढेही समजत नाही का?” त्यासाठी त्याने तोंड उघडले आणि कासव जमिनीवर पडले.

**तात्पर्य-** समाजात वागत असताना आपल्याला प्रत्येक वेळी प्रसंगाचे भान ठेवूनच वागले पाहिजे.

गेली जवळपास दोन दशके रखडलेला भारत–युरोपियन संघ (EU) मुक्त व्यापार करार अखेर मार्गी लागला असून, मंगळवार २७ जानेवारी रोजी त्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. या ऐतिहासिक करारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचे अभिनंदन करावे लागेल. विशेष म्हणजे या कराराची पहिली अधिकृत माहिती युरोपीय संघाच्या प्रमुख उर्सुला व्हॉन डर लायेन यांनी दिली.

# संधी, आव्हाने आणि बाजारपेठेची नवी दिशा



त्यामुळे या कराराबाबतची विश्वासार्हता अधिक ठळक झाली. याआधी अमेरिकेबरोबर होणाऱ्या व्यापार कराराबाबत अनेकदा घोषणा होऊनही प्रत्यक्षात काही घडले नव्हते. त्या पार्श्वभूमीवर युरोपकडून आलेली अधिकृत घोषणा महत्त्वाची ठरते. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने उर्सुला व्हॉन डर लायेन आणि युरोपीय परिषदेचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा भारत दौऱ्यावर आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत अंतिम टप्प्यातील वाटाघाटी पार पडल्या आणि भारत–युरोप मुक्त व्यापार कराराची घोषणा झाली. हा आतापर्यंतचा भारताचा सर्वात मोठा व्यापार करार मानला जात आहे. या कराराची बीजे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात रोवली गेली होती. मात्र २०१४ नंतर ही प्रक्रिया थांबली. गेल्या काही महिन्यांत मात्र या चर्चांना पुन्हा गती मिळाली आणि अखेर हा करार प्रत्यक्षात आला. यामागे जागतिक राजकारणातील बदलती परिस्थिती कारणीभूत ठरली. अमेरिका अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या संरक्षणवादी धोरणांमुळे भारत आणि युरोप दोघांनाही पर्यायी व्यापार भागीदारीची गरज भासू लागली. ‘तू नाही, तर दुसरा’ या भूमिकेतून दोन्ही बाजूंनी एकमेकांकडे पाहिले गेले आणि त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला कराराचा तिढा सुटला. युरोपीय संघ हा भारताचा प्रमुख व्यापार भागीदार आहे. गेल्या वर्षी भारत–युरोप दरम्यान सुमारे १३,६०० कोटी रुपयांचा वस्तू व सेवांचा व्यापार झाला. हा व्यापार सातत्याने वाढत आहे आणि नव्या मुक्त व्यापार करारामुळे त्याला अधिक चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. मात्र या करारात काही महत्त्वाचे अडथळे होते. त्यामध्ये युरोपमध्ये तयार होणाऱ्या मोटारींना भारतीय बाजारपेठेत प्रवेश, कृषी व खाद्यान्न क्षेत्रातील सवलती आणि युरोपने लागू केलेला कार्बन कर हे तीन मुद्दे विशेष महत्त्वाचे होते. या करारामुळे हे अडथळे बऱ्याच अंशी दूर झाल्याचे मानले जात आहे. युरोपियन मोटारी भारतीय बाजारात अधिक सहज उपलब्ध झाल्यास ग्राहकांसाठी ही आनंदाची बाब असली, तरी देशांतर्गत वाहन उद्योगासाठी ती चिंतेची ठरू शकते. याचे प्रतिबिंब भांडवली बाजारात दिसून आले.

## ।। अभंगवाणी ।।



“जे का रंजले गांजले ।
त्यासी म्हणे जो आपुले ।

तोचि साधू ओळखावा ।
देव तेथेचि जाणावा”।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**बिझनेस हेड : विकास कदम | मुख्य कार्यकारी संपादक : अविनाश आदक.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दलितांचा आवाज दाबण्यासाठी मला टार्गेट केलं

## आक्षेपार्ह विधान करणाऱ्या अंजली भारतींनी व्यक्त केली दिलगिरी

**महाईन्यूज**

**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान करणाऱ्या कव्वाली गायिका अंजली भारती यांनी आता स्पष्टीकरण दिलं आहे. त्यांनी एक व्हिडिओ जारी करून दिलगिरी व्यक्त केली आहे. मात्र, माझ्याकडून चुकून त्या शब्दाचा वापर झाला असून मला टार्गेट करण्यात आलं असल्याचंही त्या म्हणाल्या.



“ माझ्याकडून चुकून त्या शब्दाचा वापर झाला त्याबद्दल मी क्षमस्व आहे. मला टार्गेट करण्यात आलं. मी आंबेडकरी समाजाची महिला असून फक्त दलितांचा आवाज दाबण्यासाठी मला टार्गेट करण्यात आलं . मला धमक्यासुद्धा येत आहेत.

- अंजली भारती.

### गृहमंत्र्यांचं लक्ष वेधायचं होतं

अंजली भारती म्हणाल्या, एका कार्यक्रमातील माझे व्हिडिओ व्हायरल झाले असून भाजपाचे रोजंदारीवर ठेवलेले काही कार्यकर्ते टिप्पणी करत होते. काही महिलाही माझ्यावर टीका टिप्पणी करत होते. मी भीम मेळाव्यात महिलांची बाजू मांडत असताना एससी, एसटी, ओबीसी नव्हे तर सर्व मायबहिणींची बाजू मांडत होते. प्रत्येक जातीच्या महिलेवर अन्याय अत्याचार, बलात्कार होत आहेत, यावर मी बोलत होते. लहान मुलीही अत्याचारातून सुटत नाहीत. त्यामुळे गृहमंत्री, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना यांचं मला लक्ष वेधायचं होतं.”

### भाजपाकडून टार्गेट केलं गेलं

दरम्यान, अंजली भारती यांनी भाजपावर टीका केली. “मी आंबेडकरी समाजाची असल्याने दलिताचा आवाज दाबण्यासाठी यांनी मला टार्गेट करण्याचं काम केलंय. भाजपाच्या कित्येक कार्यकर्त्यांनी धमकी दिली. त्यामुळे माझा फोन स्विचऑफ करून ठेवलाय. पण जर यांना एवढीच तळमळ असेल तर जे लोकांवर अन्याय करतात, अत्याचार करतात त्यांच्यावर कारवाई करा, मी फक्त बोलले तर माझ्यावर सर्वांनी टीका करायला सुरुवात केली”, असंही त्या म्हणाल्या.

### बोलण्याच्या ओघात चुकून शब्द आले

“मला सांगायचं होतं की, कायदे अपुरे पडत आहेत. त्यामुळे गृहमंत्र्यांनी ठोस कायदा किंवा फाशीची तरतूद करावी. तुमच्या हातात कायदा असताना तुम्ही लक्ष का देत नाही. तुम्ही महिलांवर, बालिकांवर अत्याचार होत असताना तुम्हाला डोळ्यांनी पाहायचं आहे का? असा प्रश्नही त्यांनी विचारला. तसंच, ही बाजू मांडत असताना बोलण्याच्या ओघात देवेंद्र फडणवीसांच्या पत्नीबाबत चुकून तोंडून शब्द निघाला. त्याबाबत मी दिलगिरी व्यक्त केली. मी महिलांचा सन्मान करते. फुले, शाहू आंबेडकरांचे माझ्यावर संस्कार आहेत, असंही त्या पुढे म्हणाल्या.

# अजित पवारांची ‘दिल्ली मोहीम’; पक्ष विस्ताराचे होते नियोजन

**महाईन्यूज**

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर दिल्लीही हळहळली. बुधवारी सकाळी (२८ जानेवारी, २०२६) अजित पवार यांच्या अपघाताची बातमी समोर येताच दिल्लीतील पक्ष कार्यालयात नेत्यांचा व कार्यकर्त्यांचा ओघ वाढला.



“ अजित पवार हे संवेदनशील होते. ते स्पष्टवक्ते होते. त्यांच्याबरोबर काम केलेले लोक त्यांच्या या स्वभावाला कधीही विसरून शकणार नाहीत. मी त्यांना पुन्हा कधीच बघू शकणार नाही, यावर मला विश्वास बसत नाहीये.

- कुलदीप के. बुजू, राष्ट्रवादी काँग्रेस कोर कमिटी सदस्य, दिल्ली.

“ आम्ही आमचे मार्गदर्शक गमावले आहेत. मला आठवतं एकदा मी त्यांच्या पाया पडण्यासाठी वाकलो, त्यावेळी त्यांनी मला वर उचलून मिठी मारली. ते म्हणाले मी तुमच्या भावासारखा आहे. बंधू पाया पडत नाहीत, तर मिठी मारतात.

- विरेंद्र सिंह, राष्ट्रवादी काँग्रेस प्रमुख, दिल्ली.

दिल्लीतील ७९, नॉर्थ अव्हेन्यू येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यालय आहे. ‘अजितदादा’ सोडून गेले यावर विश्वासच बसत नाही, अशी भावना कार्यकर्त्यांची होती. कार्यालयात जमा झालेल्या सगळ्यांनाच धक्का बसला होता.

अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पक्ष कार्यालयात मागील वर्षी २२ जुलै रोजी मोठे बॅनर लावण्यात आले होते. त्या बॅनरसमोर अजित पवार यांचा एक फ्रेम केलेला फोटो ठेवण्यात आला. त्या फोटोला दिल्लीतील नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी पुष्प वाहून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. राष्ट्रवादीचे सरचिटणीस व प्रवक्ते बृजमोहन श्रीवास्तव म्हणाले , सध्याच्या परिस्थितीत राजकारणाविषयी व पक्षाचे काय होईल हा विचार करणे खूप घाईचे ठरेल.

आम्ही अजितदादांच्या अंत्यविधीसाठी बारामतीला जात आहोत. पुण्यापर्यंत विमानाने गेल्यानंतर तिथून बारामती जाणार आहोत. पक्षाचं काय होईल याबद्दल बोलण्याची सध्या ही वेळ नाही. सध्या अजित दादांसाठी प्रार्थना करण्याची ही वेळ आहे.

### पक्ष विस्तारासाठी नियोजन

राष्ट्रवादीच्या कार्यालयात जमा झालेल्या नेते व कार्यकर्त्यांनी पाच महिन्यांपूर्वीच अजितदादा पक्ष कार्यालयात येऊन गेले होते, त्यावेळच्या आठवणी सांगितल्या. “दिल्लीत पक्षाचा विस्तार करण्यासाठी अजितदादांनी काही नियोजन केले होते. त्यांच्या नियोजनावर आम्ही चर्चा केली होती. दिल्लीत पक्ष कसा वाढवता येईल, तसेच दिल्लीत होऊ घातलेल्या महानगरपालिका निवडणुकांच्या तयारीबाबत चर्चा झाली होती. देशाच्या राजधानीत पक्षाचा विस्तार करण्यासाठी अजितदादांनी मोठे नियोजन केले होते.”, असे राष्ट्रवादीचे सरचिटणीस व प्रवक्ते बृजमोहन श्रीवास्तव म्हणाले.

# कोलंबियात लँडिंगच्या आधी विमान क्रॅश

## एका खासदारासह १५ जणांचा मृत्यू; घटना कॅमेरात कैद



**महाईन्यूज**

**कोलंबिया : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी सकाळी विमान अपघातात निधन झालं. बारामतीत विमानाचं लँडिंग होत असतानाच विमानाचा अपघात झाला आणि यामध्ये अजित पवार यांच्यासह सहा जणांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त होत आहे.**

आता अशाच प्रकारची एक घटना कोलंबियामध्ये देखील घडली आहे. कोलंबियामध्ये भीषण विमान अपघात झाला आहे. या विमान अपघातामध्ये एका कोलंबियन खासदारासह आणखी १५ जणांचा मृत्यू झाला आहे. या विमान अपघाताच्या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ही घटना बुधवारी व्हेनेझुएलाजवळील प्रदेशात घडल्याची माहिती सांगितली जात आहे.

समोर आलेल्या वृत्तानुसार, हे विमान कोलंबियाच्या सरकारी मालकीच्या एअरलाइन्सचं होतं. या अपघाताच्या घटनेत विमानातील सर्व प्रवासी आणि विमानातील क्रू मेंबर्स यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर विमान चालवणाऱ्या सरकारी मालकीच्या सॅटेना एअरलाईन्सने म्हटलं की, 'ही घटना ज्या ठिकाणी घडली, तेथील स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी विमान कोसळल्याची माहिती प्रशासनाला दिली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.'दरम्यान, विमान अपघाताची घटना नेमकं कशी घडली? याची चौकशी करण्यात येणार आहे. या बरोबरच याच विमानात कोलंबियन संसदेचे सदस्य डायोजेनेस क्विंटेरो हे अपघाताच्या वेळी विमानात होते आणि या घटनेत त्यांचाही मृत्यू झाला. दरम्यान, कोलंबियन मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलं की, 'विमान अपघात झाल्यानंतर त्या विमानातील प्रवाशांपैकी दुर्दैवाने कोणीही वाचलं नाही.'

कॅमिलो डाझा आंतरराष्ट्रीय विमानतळावरून या विमानाने उड्डाण केल्यानंतर काही मिनिटांमध्येच या विमानाचा हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाशी संपर्क तुटला आणि त्यानंतर ही घटना घडली. अपघात घडला तेव्हा विमानात १३ प्रवासी आणि दोन क्रू मेंबर्स होते. या विमान अपघाताच्या घटनेनंतर कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत शोक व्यक्त केला. "या घटनेमुळे मला खूप दुःख झालं आहे. या घटनेत मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांबरोबर माझ्या संवेदना आहेत", असं त्यांनी म्हटलं आहे.

# सौदी अरेबिया भारतासोबत 'डॅमेज कंट्रोल' मोडमध्ये



**महाईन्यूज**

**रियाध : मध्यपूर्वेतील राजकारणात वेगाने घडणाऱ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारत आणि सौदी अरब यांच्यात (२८ जानेवारी रोजी) संरक्षण क्षेत्राबाबत महत्त्वाची बैठक पार पडली. भारताने नुकताच संयुक्त अरब अमिरातीसोबत (UAE) धोरणात्मक भागीदारीसाठी 'लेटर ऑफ इंटेंट' स्वाक्षरी केल्यानंतर आता सौदीच्या हालचाली वाढल्या आहेत.**

पाकिस्तानसोबत सुरक्षा करार केल्यानंतर भारताच्या मनात निर्माण झालेला अविश्वास दूर करण्यासाठी सौदी अरेबिया 'डॅमेज कंट्रोल' करत असल्याचे संकेत मिळत आहेत. भारत-यूएई संरक्षण करारामुळे रियाध काहीसा चिंतेत असल्याची चर्चा असून, याच पार्श्वभूमीवर भारत आणि संयुक्त अरब अमिरातीसोबतच्या कराराला विशेष महत्त्वप्राप्त झाले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सौदीची राजधानी रियाध येथे पार पडलेल्या बैठकीत दोन्ही देशांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुरक्षा सहकार्याचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीचे सह-अध्यक्षपद भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे संयुक्त सचिव विनोद बहाडे आणि सौदीच्या गृह मंत्रालयाचे महासंचालक अहमद अल-ईसा यांनी भूषवले. यावेळी कट्टरतावाद, दहशतवादी कारवायांना होणारा अर्थपुरवठा, दहशतवादासाठी तंत्रज्ञानाचा वापर आणि आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी यांसारख्या आव्हानांवर सविस्तर चर्चा झाली. विशेष म्हणजे,एप्रिल २०२५मध्ये झालेला पहलगाम हल्ला आणि १० नोव्हेंबरचा लाल किल्ल्यावरील दहशतवादी हल्ल्याचा सौदीने तीव्र निषेध केला आहे.

सौदी अरेबियाने गेल्या वर्षी पाकिस्तानसोबत 'नाटो' (NATO) धर्तीवर सुरक्षा करार केला होता. दुसरीकडे, येमेन युद्धावरून सौदी आणि यूएई यांच्यातील संबंध ताणले गेले आहेत. अशातच यूएईचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन जाएद यांनी अचानक भारताचा दौरा करून संरक्षण करारावर स्वाक्षरी केल्याने सौदी सावध झाला आहे. दक्षिण आशियातील आपला सर्वात मोठा भागीदार असलेल्या भारतासोबतचे संबंध विस्कळीत होऊ नयेत, असा सौदीचा प्रयत्न आहे.

### भारताची भूमिका स्पष्ट

सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती (UAE) हे भौगोलिकदृष्ट्या ते एकमेकांचे शेजारी आहेत आणि दोघेही 'गल्फ कोऑपरेशन कौन्सिल' (GCC) चे सदस्य आहेत. हे दोन्ही देश पारंपारिक मित्र राहिले आहेत, परंतु गेल्या काही वर्षांत त्यांच्यात 'मैत्रीपूर्ण स्पर्धा' आणि काही मुद्द्यांवर 'मतभेद' दिसून आले आहेत. एईसोबतच्या संरक्षण करारामुळे भारत मध्यपूर्वेतील कोणत्याही संघर्षात ओढला जाणार नाही, असे भारतीय अधिकाऱ्यांचे मत आहे. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी स्पष्ट केले की, " आता झालेला करार दोन्ही देशांमधील आधीपासून असलेल्या संरक्षण सहकार्याचा नैसर्गिक विस्तार आहे. याकडे कोणत्याही प्रादेशिक घटनेला दिलेले उत्तर किंवा भविष्यातील काल्पनिक परिस्थितीशी जोडून बघू नये."

# माधुरी दीक्षितला 'या' क्षेत्रात करायचे होते करिअर; धकधक गर्लचे शिक्षण किती?

माधुरी दीक्षित ही बॉलीवूडची धकधक गर्ल म्हणून ओळखली जाते. अभिनेत्रीने 'अबोध' या चित्रपटातून पदार्पण केले होते. १९८४ ला हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. अभिनेत्रीला १९८८ ला प्रदर्शित झालेल्या 'तेजाब' या चित्रपटातून मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. तेजाबमधून लोकप्रियता मिळाल्यानंतर अभिनेत्रीने मागे वळून पाहिले नाही. तिने एकापेक्षा एक भूमिका आणि चित्रपट यातून बॉलीवूडमध्ये स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. माधुरीच्या अभिनयाचा नाही तर तिच्या नृत्याचादेखील चाहतावर्ग निर्माण झाल्या. तिच्या अनेक भूमिका गाजल्या. वर्दी, राम लखन, परिंदा, प्रेम प्रतिज्ञा, जमाई राजा, मुजरिम, त्रिदेव, किशन कन्हैय्या, जीवन का संघर्ष, मृत्यूदंड, राजा, कोयला, देवदास, हम तुम्हारे हैं सनम, लज्जा, हम आपके हैं कौन, कलंक असे माधुरीचे अनेक चित्रपट गाजले. माधुरी दीक्षितचे शिक्षण किती? वाचा... माधुरी दीक्षित तिच्या व्यावसायिक आयुष्यामुळे चर्चेत येत असली, तरी ती कायमच तिच्या खासगी आयुष्यामुळेदेखील चर्चांचा भाग बनली आहे. माधुरीने यशाच्या शिखरावर असताना लग्न करण्याचा निर्णय घेतला. लग्नानंतर ती पतीसह अमेरिकेत स्थायिक झाली. काही काळ ती चित्रपटांपासून दूर होती. मात्र, अभिनेत्री आता पुन्हा एकदा चित्रपटात काम करत आहे. ती पतीसह भारतात परतली आहे. विविध मुलाखतींमधून ती तिच्या व्यावसायिक आणि खासगी आयुष्यातील अनेक किस्से सांगते. तिचा पती, मुले यांच्याबद्दलही माधुरी मनमोकळेपणाने बोलत असते. आज आपण माधुरीच्या शिक्षणाबद्दल जाणून घेऊ... बॉलीवूडवर राज्य करणाऱ्या माधुरी दीक्षितचे शिक्षण किती आहे, हे तुम्हाला माहित आहे का? माधुरीचा जन्म एका मराठी कुटुंबात झाला. तिने मुंबईमधील अंधेरीतील डिवाइन चाइल्ड हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमधून माध्यमिक शिक्षण घेतले. त्यामुळे तिने विले पार्लेमधील साठे कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथे अकरा-बारावीचे शिक्षण घेतले. तिला मायक्रोबायोलॉजिस्ट बनायचे होते.



# 'करण जोहर तुला लाज वाटली पाहिजे... रिटायर हो' RARKPK पाहताच संतापली कंगना

प्रसिद्ध अभिनेत्री कंगना राणौत सध्या तिच्या चित्रपटापेक्षा तिच्या वक्तवायांमुळे चर्चेत आहे. कंगना बॉलिवूडच्या कोणत्या दिग्दर्शक अभिनेत्यावर कधी आणि कसा निशाणा साधेल काही सांगता येत नाही. ती अनेकदा दिग्दर्शक-निर्माता करण जोहरला घराणेशाहीच्या वादावरून टार्गेट करते. करण जोहर सोबत तिचे बरेच वाद आहेत. ती नेहमी त्याला बॉलिवूडचा माफिया म्हणून हिणवत असते. अशातच कंगनाने पुन्हा एकदा करण जोहरवर निशाणा साधला आहे. काय आहे नेमकं प्रकरण जाणून घ्या. करण जोहरचा 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' शुक्रवारी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. सध्या मोठ्या पडद्यावर ओपेनहाइमर, बार्बी आणि मिशन इम्पॉसिबल जोरात सुरू आहेत. कंगनाने क्रिस्टोफर नोलनच्या 'ओपेनहाइमर' या चित्रपटाचे कौतुक करताना करण जोहरविषयी मुक्ताफळं उधळली आहेत. तसेच यावेळी तिने अभिनेता रणवीर सिंगलाही धारेवर धरलं आहे. कंगना रणौत आणि करण जोहर यांच्यातील वाद खूप जुना आहे हे सर्वांनाच माहीत आहे. करण जोहरला इंडस्ट्रीत नुकतीच २५ वर्ष पूर्ण झाली असून त्याने या मुहूर्तावर रॉकी और राणी की प्रेम कहाणी हा चित्रपट प्रदर्शित केला आहे. आता हा चित्रपट रिलीज होताच, कंगनाने तिच्या इंस्टाग्रामवर करण जोहरविषयी एक पोस्ट लिहिली आहे. कंगनाने लिहिले, "भारतीय प्रेक्षक अण्वस्त्रे आणि अणुविज्ञानाच्या निर्मितीवर आधारित 3 तासांचा चित्रपट पाहत आहेत आणि येथे नेपो गँग तिचं सासू सुनेची भांडण दक्खवण्यात बिझी आहे. आमच्याकडे तर डेली सोप बनवायलाच 250 कोटींची गरज भासते."



# फ्लाईटमधील कियाराचा किस्सा व्हायरल

बॉलीवूडमधील कलाकारांची एक झलक पाहण्यासाठी चाहते तासन्तास वाट पाहतात. मात्र काही वेळा त्याच कलाकारांचे वर्तन चाहत्यांच्या अपेक्षांना तडा देणारे ठरते. अशीच एक घटना अभिनेत्री कियारा अडवाणी हिच्याबाबत समोर आली आहे. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर कार्तिकेय याने इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये त्याने दावा केला आहे की, तो जयपूरहून मुंबईकडे आईसोबत बिझनेस क्लासने प्रवास करत होता. त्याच फ्लाईटमध्ये अभिनेत्री कियारा अडवाणी आणि अभिनेता कार्तिक आर्यन हेही प्रवास करत होते. हे दोघे 'सत्यप्रेम की कथा' या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी जयपूरला गेले होते. फ्लाईटमध्ये सीट क्रमांकाबाबत गोंधळ झाल्याने त्याची आई चुकून कियाराच्या सीटवर बसली. मात्र एअरहोस्टेसने माहिती दिल्यानंतर त्या तत्काळ उठून आपल्या जागेवर गेल्या. या संपूर्ण प्रकारात कोणताही वाद झाला नाही, असेही कार्तिकेयने स्पष्ट केले. मात्र कार्तिकेयने असा आरोप केला आहे की, या घटनेदरम्यान कियारा अडवाणीने जी प्रतिक्रिया दिली, ती अत्यंत अप्रिय आणि उद्धट होती. माझ्या आईकडे पाहून तिने तोंड वाकडं केलं आणि अस्वस्थ चेहऱ्याचे हावभाव केले, असा दावा त्याने व्हिडीओमध्ये केला आहे. यावरून अनेक यूजर्सनी कियारावर टीका केली आहे.



# 'नुसता जाळ अन् धूर' शाहीद-दिशाचे 'आशिकों की कॉलोनी' गाणे पाहाच!

'O ROMEO' चित्रपटातील 'आशिकों की कॉलोनी' या नव्या गाण्यात शाहीद कपूर आणि दिशा पटानीची फ्रेश केमिस्ट्री प्रेक्षकांना भुरळ घालत आहे. ग्लॅमरस लूक, रोमँटिक मूड आणि दमदार डान्स मूव्ह्समुळे हे गाणं सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. बॉलिवूडमध्ये पुन्हा एकदा रोमँटिक म्युझिकचा धडाका पाहायला मिळतोय. ओ रोमियो चित्रपटातील 'आशिकों की कॉलोनी' गाणे रिलीज झाले आहे. शाहिद कपूर आणि दिशा पटानी यांची फ्रेश केमिस्ट्री या गाण्यात पाहायला मिळतेय. 'O ROMEO' या आगामी चित्रपटातील हे गाणं रिलीज होताच सोशल मीडियावर व्हायरल झालं आहे. या गाण्यात शाहीद कपूरचा चार्म आणि दिशा पटानीचा ग्लॅमरस अवतार पाहायला मिळतो. दोघांची फ्रेश केमिस्ट्री प्रेक्षकांच्या पसंतीस उतरतेय.दिशा पटानी नेहमीप्रमाणे तिच्या फिटनेस, ग्रेस आणि डान्स मूव्ह्सने लक्ष वेधून घेत आहे. तर शाहीद कपूरचा सहज, रोमँटिक अंदाज पुन्हा एकदा चाहत्यांना आवडताना दिसतोय. या दोघांची जोडी पहिल्यांदाच एकत्र स्क्रीनवर दिसत आहे. साजिद नाडियाडवालाचा आगामी चित्रपट 'ओ रोमियो'चा ट्रेलरदेखील सिनेरसिकांच्या पसंतीस उतरला होता. आता चित्रपटातील गाणे देखील व्हायरल होत आहे. 'आशिकों की कॉलोनी' हे दुसरे गाणे आहे. फुल-ऑन डान्स नंबर असून दिशा पटानीवर चित्रीत करण्यात आले आहे. नव्वदच्या दशकातील रंगीन बॉलीवूड वाईब्स असणाऱ्या या गाण्याला मॉडर्न संगीत दिले आहे. सूर जुनेच असले तरी मॉडर्न स्टाईल गाणे फुल मूड ऑन फ्रेश करणारे आहे.



# पाकिस्तान अखेर नमलं!

## टी-२० वर्ल्डकपसाठी पाकिस्तानचा संघ श्रीलंकेला जाणार

**महाईन्यूज**

**नवी दिल्ली : आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला येत्या ७ फेब्रुवारीपासून सुरूवात होणार आहे. या स्पर्धेआधी मोठा फेरबदल करण्यात आला आहे. बांगलादेशने या स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर बांगलादेशऐवजी स्कॉटलंडचा समावेश करण्यात आला आहे. बांगलादेशने भारतात येऊन ही स्पर्धा खेळण्यास नकार दिला होता.**





त्यामुळे बांगलादेशचे सामने दुसऱ्या देशात खेळवले जावे, अशी मागणी करण्यात आली होती. पण आयसीसीने ही मागणी फेटाळून लावली. बांगलादेशनंतर पाकिस्तान सुद्धा भारताविरूद्ध होणाऱ्या सामन्यावर बहिष्कार टाकणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. दरम्यान पाकिस्तानने आपल्या निर्णयावरून यू टर्न घेतला असल्याची माहिती समोर येत आहे.

पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तान क्रिकेट बोर्डच्या सुत्राने सांगितले की, पाकिस्तान क्रिकेट बोर्ड पाकिस्तान संघाला टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी कोलंबोला पाठवण्याच्या तयारीत व्यस्त आहे. त्यामुळे पाकिस्तानचा संघ भारताविरूद्ध होणाऱ्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची शक्यता खूप कमी आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणारा सामना १५ फेब्रुवारीला खेळवला जाणार आहे.

सुत्राने दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तान क्रिकेट बोर्डने आधीच खेळाडूंच्या प्रवासाचं नियोजन केलं आहे. पाकिस्तानचा संघ २ फेब्रुवारीला कोलंबोला जाण्यासाठी रवाना होणार आहे. आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचे यजमानपद भारताकडे आहे. पण पाकिस्तानने भारतात येण्यास नकार दिला आहे. आयसीसीच्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला आहे की, भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणारे सामने हे न्यूट्रल वेन्यूवर खेळवले जातील. त्यामुळे पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेत खेळवले जाणार आहेत.

पीसीबी प्रमुख मोहसिन नक्वी यांनी संघाच्या सहभागाबाबत निर्णय घेण्यासाठी आयसीसीकडे मुदत मागितली आहे. २ फेब्रुवारीला सोमवार असून मोहसिन नक्वी पाकिस्तानच्या स्पर्धेतील सहभागाबाबत निर्णय कळवू शकतात. पण निर्णय येण्याआधीच खेळाडूंची टी-२० वर्ल्डकपसाठी श्रीलंकेला रवाना होण्याची तयारी सुरू झाली आहे. यावरून पाकिस्तानचा संघ स्पर्धेत सहभागी होणार, हे जवळजवळ निश्चित झालं आहे.

आगामी आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत पाकिस्तानचा पहिला सामना ७ फेब्रुवारीला नेदरलँडविरूद्ध होणार आहे. त्यानंतर १० फेब्रुवारीला होणाऱ्या सामन्यात यूएसएचा सामना करणार आहे. त्यानंतर १५ फेब्रुवारीला होणाऱ्या सामन्यात भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. तर १८ फेब्रुवारीला पाकिस्तानचा सामना नामिबीयाविरूद्ध होणार आहे.

# रवी शास्त्रींच्या 'ऑल टाइम ग्रेट' यादीतून हिटमॅन आऊट!

**महाईन्यूज**

**मुंबई : भारतीय क्रिकेट संघाने गेल्या काही दशकांपासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटवर राज्य केलं आहे. भारताने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अनेक स्टार खेळाडू दिले. ज्यात सुनील गावसकर आणि सचिन तेंडुलकर सारख्या दिग्गज खेळाडूंचा समावेश आहे.**



### ५ नावांमध्ये 'या' दिग्गजांचा समावेश

सचिन तेंडुलकर, विराट कोहली, सुनील गावसकर, एम.एस धोनी, कपिल देव

त्यामुळे जेव्हा सर्वोत्तम ५ खेळाडूंची निवड करण्याची वेळ येते, तेव्हा नेमके ५ कोण? असा प्रश्न सर्वांनाच पडतो. दरम्यान भारताचे माजी क्रिकेटपटू आणि माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी भारतीय ऑल टाईम ग्रेट ५ खेळाडूंची निवड केली आहे. या यादीत त्यांनी वर्ल्डकपविजेत्या कर्णधाराला स्थान दिलेलं नाही.

रवी शास्त्री यांनी स्टिक टू क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाचा माजी खेळाडू मायकल वॉनच्या प्रश्नाचं उत्तर देताना सांगितलं, “७० च्या दशकात सनी (सुनील गावसकर), ८० च्या दशकात कपिल, ९० च्या दशकात सचिन, मग मी धोनी आणि विराटची निवड करेन.”

या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या ॲलेस्टर कूकने विचारलं, यांपैकी नंबर १ कोण? यावर उत्तर देताना सुनील गावसकर म्हणाले, “फलंदाजीबद्दल बोलायचं झालं, तर कपिल उत्तम आहे. एकूण बोलायचं झालं तर, तो सचिन तेंडुलकर असेल. तो बराच काळ देशासाठी खेळला आहे. त्याने २४ वर्ष देशाचं प्रतिनिधित्व केलं आहे. त्याने १०० शतकं झळकावली आहेत. त्याने प्रत्येक दशकातील वेगवान गोलंदाजांचा सामना केला आहे.”

रवी शास्त्री यांनी निवडलेले पाचही खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील दिग्गज खेळाडू आहेत. या पाचही खेळाडूंनी भारतीय क्रिकेटला पुढे घेऊन जाण्यात मोलाचं योगदान दिलं आहे. पण रवी शास्त्री यांनी भारताला चॅम्पियन्स ट्रॉफी आणि आयसीसी टी-२० वर्ल्डकप जिंकून देणाऱ्या रोहित शर्माचा उल्लेख सुद्धा केलेला नाही. त्यामुळे क्रिकेट चाहत्यांनी सोशल मीडियावर नाराजी व्यक्त केली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

।शुक्रवार।
दि. 30 जानेवारी 2026।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# ‘स्वच्छ सर्वेक्षण 2026’

## पिंपरी चिंचवड महापालिकेची जोरदार तयारी सुरू




**महाईन्यूज**

**पिंपरी : स्वच्छ सर्वेक्षण २०२५ स्पर्धेत राज्यात सर्वप्रथम आणि देशात सातवा क्रमांक प्राप्त केलेल्या पिंपरी चिंचवड महापालिकेने स्वच्छ सर्वेक्षण २०२६ साठी देशात अव्वल क्रमांक मिळविण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. या अनुषंगाने शेकडो सफाई सेवक अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने शहराचे रूप पालटण्याचे काम सध्या अविरतपणे करीत आहेत.**

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व सहायक आयुक्त अमित पंडित यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येणाऱ्या अहोरात्र स्वच्छता मोहिमेमुळे नागरिकांना धूळमुक्त, स्वच्छ आणि प्रसन्न वातावरण अनुभवायला मिळत आहे.

### ओला व सुका कचरा वेगळा द्या

- कचरा विलगीकरण करून घरगुती कचरा हा ओला व सुका असा वेगळा करून घंटागाडीला द्यावा.
- रस्त्यांवर अनधिकृत पार्किंग टाळावे, जेणेकरून साफसफाईत अडथळे येणार नाहीत.
- सार्वजनिक ठिकाणे व आपला परिसर स्वच्छ ठेवावा.

> पिंपरी चिंचवड शहरात राबविण्यात येणाऱ्या अहोरात्र स्वच्छता मोहिमेमुळे दिवसभर वाहतुकीने गजबजलेल्या प्रमुख रस्त्यांची प्रभावी साफसफाई शक्य होत आहे. आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर आणि सफाई सेवकांचे समर्पित योगदान यामुळे शहराची स्वच्छता पातळी सातत्याने उंचावत आहे. ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२६’ मध्ये उल्लेखनीय स्थान मिळवण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे. सफाई सेवकांच्या या प्रयत्नांना बळ देण्यासाठी नागरिकांनी कचरा विलगीकरण करणे व सार्वजनिक स्वच्छता राखणे ही सामूहिक जबाबदारी समजून सक्रिय सहभाग नोंदवावा.
>
> -डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड हे उद्योगनगरी आणि गजबजलेल्या बाजारपेठांचे शहर असल्याने पिंपरी कॅम्प, चिंचवड स्टेशन, भोसरी तसेच हिंजवडी आयटी पार्ककडे जाणारे प्रमुख रस्ते दिवसभर वाहनांनी गजबजलेले असतात. त्यामुळे दिवसा स्वच्छता करणे मोठे आव्हान ठरते. ही अडचण लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने रात्रपाळी स्वच्छता मोहीम अधिक तीव्र केली आहे.

या मोहिमेत मनुष्यबळासोबत आधुनिक यंत्रसामग्रीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. मेकॅनिकल स्वीपिंग मशीनद्वारे मुख्य रस्त्यांवरील बारीक धूळ हटवली जाते. वॉटर स्प्रिंकलर्सच्या साहाय्याने रस्ते व दुभाजक धुऊन हवेतल्या धुळीचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

तसेच कचरा वाहतूक यंत्रणा रात्रीच कचरा डेपोपर्यंत पोहोचवत असल्याने स्वच्छतेच्या कामाला गती मिळत आहे.सर्व कर्मचारी आवश्यक सुरक्षासाहित्य परिधान करून रात्रभर कार्यरत असतात.

शहर झोपेत असताना हे ‘स्वच्छता योद्धे’ शहराला नव्या पहाटेची तयारी करून देतात. महापालिका प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी विशेष उपाययोजनाही करण्यात आल्या आहेत.

# संत साई इंग्लिश स्कूल, भोसरी येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## प्रभात फेरी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि देशभक्तीपर वातावरणात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग






**महाईन्यूज**

**पिंपरी : संत साई इंग्लिश स्कूल, भोसरी येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. संपूर्ण शाळा परिसर तिरंग्याच्या रंगात न्हाऊन निघाला असून विद्यार्थ्यांपासून शिक्षक, पालक व मान्यवरांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना दिसून आली.**

प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळच्या प्रहरी संस्थेतर्फे सर्व विद्यार्थ्यांची भव्य प्रभात फेरी काढण्यात आली.

विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन ढोल-ताशे, बँड वाद्यांच्या गजरात देशभक्तीपर घोषणा देत परिसर दुमदुमून टाकला. या फेरीमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यानंतर कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सन्माननीय श्री. शिवलिंग ढवळेश्वर सर, मान्यवर अतिथी, शिक्षक व पालक प्रतिनिधी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उत्साह व जल्लोष पाहून उपस्थित मान्यवर भारावून गेले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रो. सौ. सोनाली दत्तात्रय गव्हाणे (नगरसेविका, पी.सी.एम.सी.), सौ. राणी अशोक पठारे (नगरसेविका, पी.सी.एम.सी.), शाळेचे पहिले विद्यार्थी व उद्योजक श्री. सुशील मालुंजकर, संस्थेच्या विश्वस्त सौ. पायल ढवळेश्वर मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर सामूहिक राष्ट्रगीत गायन झाले व भारतीय तिरंग्यास मानवंदना देण्यात आली.

इयत्ता चौथीतील विद्यार्थी श्रीशा पाटेकर व आयुष मुतांगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सौ. स्वाती मोघे मॅडम यांनी उपस्थित मान्यवर, अतिथी व पालक प्रतिनिधींचे स्वागत करून त्यांना व्यासपीठावर आमंत्रित केले. सौ. पायल ढवळेश्वर मॅडम यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व संस्कारक्षम उपक्रमांची माहिती दिली. संस्थापक अध्यक्ष श्री. शिवलिंग ढवळेश्वर सर यांनी सर्व मान्यवरांचे कार्यपुस्तिका, मनःशक्ती प्रार्थना पुस्तिका, शाल व श्रीफळ देऊन यथोचित सन्मान केला.

यानंतर विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत देशभक्तीपर भाषणे सादर केली. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले. तसेच विविध कला, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. देशभक्तीपर समूहगायन, गुणदर्शन कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली व टाळ्यांचा कडकडाट झाला.

रामभरण सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध सैनिकी कसरतींची प्रात्यक्षिके सादर केली. या प्रात्यक्षिकांमधून शिस्त, ताकद व देशसेवेचा संदेश देण्यात आला

अध्यक्षीय भाषणात संस्थापक अध्यक्ष सन्माननीय श्री. शिवलिंग ढवळेश्वर सर यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व विशद केले. प्रजासत्ताक दिन म्हणजे आपल्या हक्क, कर्तव्य व एकात्मतेची जाणीव करून देणारा दिवस असून देशासाठी बलिदान दिलेल्या क्रांतिकारकांना कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजली अर्पण करण्याचा हा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक विद्यार्थी हा राष्ट्राचा जबाबदार नागरिक घडविणे हेच संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख अतिथी प्रो. सौ. सोनाली दत्तात्रय गव्हाणे यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देताना शाळेच्या ज्ञानदानासोबतच संस्कारक्षम उपक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांचे भवितव्य सुरक्षित व सशक्त हातात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. इतर मान्यवरांनीही आपल्या भाषणातून संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या

प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. शेवटी सामूहिकरीत्या 'वंदे मातरम्' गायन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या संचालिका सौ. सुनीता ढवळेश्वर मॅडम, सौ. मीना सोपुरे, सौ. सुहासिनी बदोले, श्री. मनोज वाबळे, श्री. काशिनाथ कतनाळी, श्री. प्रमोद शिंदे, श्री. भागवत वानखेडे, श्री. विठ्ठल पुंडे, श्री. संजय अनारथे, श्री. अक्षय राणे तसेच शिक्षक व पालक प्रतिनिधी सौ. अनिता गव्हाणे, सौ. मोकाशी यांचे विशेष सहकार्य लाभले.

सौ. शीतल गवांदे मॅडम यांनी आभार प्रदर्शन केले.

# भाड्याचे पैसे मागणाऱ्या चालकावर हल्ला, मोबाइल हॅक करून फळ विक्रेत्याची साडेपाच लाखांची फसवणूक




**महाईन्यूज**

**पिंपरी : वाहतूक कार्यालयामध्ये गाडी भाड्याचे पैसे मागण्यासाठी गेलेल्या चालकावर टोळक्याने जीवघेणा हल्ला केला. ही घटना मंगळवारी (२७ जानेवारी) चिंबळी फाटा येथे घडली.**

आनंद दिलीप कारंडे (४२, कारंडेवाडी, माण, सातारा) यांनी याप्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार जावेद महमंद शेख (४०, काळेवाडी), शोएब खलील मोमीन (४०, फुलेनगर वाई, सातारा), राजकुमार रामचंद्र भोसले (२५, सांगोला, सोलापूर) आणि सुनील सखाराम राठोड (२२, जिंतुर, परभणी) यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी कारंडे हे आरोपी जावेदकडे भाड्याचे पैसे मागण्यासाठी गेले होते. त्यावेळी जावेदने शिवीगाळ करत इतर आरोपींना तिथे बोलावून घेतले. एका आरोपीने फिर्यादीच्या डोक्यात छोटा गॅस सिलेंडर मारला, तर दुसऱ्याने डोक्यात फरशी मारून गंभीर जखमी केले.

सिलेंडर हवेत उंचावून आरोपीने आरडाओरडा केल्याने परिसरातील लोक भीतीपोटी पळून गेले आणि दुकाने बंद करून घेतली.

फिर्यादीला जीवे मारण्याच्या उद्देशाने हा हल्ला करण्यात आला होता. आळंदी पोलीस तपास करत आहेत.




# Beyond Marks: Why Emotional Well-Being tters in Schools



VEDIKA SHOVEL
PRIYADARSHANI SCHOOL MOSHI

**IN RECENT YEARS, THE EDUCATION SYSTEM HAS BECOME INCREASINGLY RESULT-ORIENTED. MARKS, GRADES, AND RANKINGS OFTEN TAKE CENTER STAGE IN DEFINING A STUDENT'S SUCCESS. AS A TEACHER WHO INTERACTS WITH STUDENTS DAILY, I STRONGLY BELIEVE THAT WHILE ACADEMIC ACHIEVEMENT IS IMPORTANT, IT SHOULD NOT COME AT THE COST OF A CHILD'S EMOTIONAL WELL-BEING.**

In the classroom, teachers witness much more than academic performance. We see students who are anxious before exams, hesitant to speak due to fear of making mistakes, and overwhelmed by expectations placed upon them. Many students silently struggle with stress, comparison, family pressure, and self-doubt. These challenges, if ignored, can deeply affect their confidence and overall development.

From my experience, a student who feels emotionally safe and understood performs better academically. When students know that their teacher listens to them, supports them, and values effort over perfection, they become more confident learners. They ask questions freely, participate actively, and are not afraid of failure.

Emotional well-being creates a strong foundation for meaningful learning.

Schools must therefore focus on creating a supportive environment where students are encouraged not only to excel academically but also to express themselves openly.

Teachers play a key role in this process. Simple practices such as positive reinforcement, patience, and individual attention can have a lasting impact on a child's mindset. Treating mistakes as learning opportunities rather than failures helps students develop resilience.

It is equally important to include life skills, value education, and emotional awareness in school education. Teaching students how to manage stress, work collaboratively, and respect differences prepares them for real-life challenges. Guidance and counseling support, along with teacher sensitization, can further strengthen students' emotional health.

Education is not just about producing high scorers; it is about shaping balanced individuals. As teachers, our responsibility goes beyond completing the syllabus. When emotional well-being is given equal importance as academics, schools can truly fulfill their role in nurturing confident, compassionate, and capable individuals.

Vedika Kailas Shovel at,Teacher Primary section.
priyadarshani school, moshi

PRIYADARSHANI
GROUP OF SCHOOLS
43 Years of Excellence in Education



SHRI AJIT DADA PAWAR
( DEPUTY CHIEF MINISTER OF MAHARASHTRA )
22 JULY 1959 – 28 JANUARY 2026

Heartfelt tribute to Shri Ajit Dada Pawar, Deputy Chief Minister of Maharashtra — gone too soon, remembered forever.
ॐ शांति

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
www.priyadarshanischools.org


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046